जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१६/०९/२०२३
## दि.१५/०९/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ६३३/२०२३,भादविक ३९४, ३४. |
| **फिर्यादी** | एस इसम वय ४२ वर्षे, रा. महाड, जि.रायगड, |
| **आरोपीत** | १) आकाश हनूमंत भंडारी वय २३ वर्षे रा.सेवक चौक येरवडा पुणे २) अनुज सोमनाथ जोगदंड वय १९ वर्षे रा.येरवडा पुणे ३)योगेश दिलीप नवघणे वय ३० वर्षे रा.गोकुळनगर कात्रज-कोंढवा रोड,पुणे ४)सलमान फारूख कुरेशी वय २३ वर्षे येरवडा पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०९/२०२३ रोजी रात्री १२/३० वा.चे दरम्यान चिमाघाट, येरवडा पुणे येथे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मित्रासह नमुद ठिकाणी बसले असताना त्याठिकाणी नमुद चार इसम आले त्यांनी फिर्यादी व त्यांचे मित्रास येथे काय करत आहात असे म्हणुन शिवीगाळ करून फिर्यादी यांचे हातावर शस्त्राने वार करून यांचे खिशातील ९०,०००/- रूपये काढुन घेतले |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. आर.ए.शेख, मो.नं. ८२३७६०९२०७ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी काळभोर पो स्टे ५७५/२०२३,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | अजय बोरकर वय ५३ वर्षे रा.कटकेवाडी वाघोली पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०९/२०२३ रोजी सकाळी ०८/३० ते दि. १३/०९/२०२३ रोजी सकाळी १०/३० वा.च्या सुमा.उरळी देवाची गावांतील सासवड ते पुणे रोडच्या पश्चिम बाजुला असणारे साईराज ट्रेडर्स नावाचे दुकानात. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी याचे नमुद ठिकाणी असलेल्या दुकानाचा पत्रा कोणीतरी अज्ञात इसमाने कापून तो उचकटवून त्यावाटे दुकानात प्रवेश करून दुकानातील एकुण ८,९५,१७२/-रु.किं.चे बिल्डींग मटेरियल्स व रोख रक्कम असा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. जितेंद्र खैरनार मो.नं.८१०८७७२६२६ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १३७९/२०२३,भादविक ३०६ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ४८ वर्षे,रा.बी.टी.कवडे रोड,घोरपडी, पुणे |
| **आरोपीत** | आदर्श अजयकुमार मेनन,वय २५ वर्षे रा. झेड कॉर्नर, मांजरी पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०९/२०२३ रोजी पहाटे ०३/०० ते ०३/३० वा.चे दरम्यान बी-५०२, शारदा अनन्या सेंटर, ४० फुट रोड,दत्त मंदीराचे समोर,झेड कॉर्नर,मांजरी पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची मयत मुलगी हिचे व नमुद इसम यांचेत प्रेमसंबंध होते.त्यास फिर्यादी यांची मुलगी हीने त्याला वेळोवेळी क्रेडीट कार्ड, पर्सनल लोन व इतर ५/६ लोन ॲपवरून लोन (कर्ज) घेवून ते पैसे खर्च करण्यास दिले होते सदरचे कर्जाचे हप्ते नमुद इसम हा फेडणार असे त्याने आश्वासन देवूनही त्याने ते वेळोवेळी फेडलेले नाही. या कारणांवरून त्या दोघांमध्ये वारंवार भांडण झालेले होते.त्यामुळे त्याने कर्जाचे हप्ते वेळोवेळी न फेडता फिर्यादी यांचे मुलीस मानसिक त्रास देवून नमुद इसमाने तीला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |

| | |
|---|---|
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.अशोक गांधले मो नं ९३७००७६३०५ |

**४**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ५८४/२०२३,भादविक ४२० |
| **फिर्यादी** | एक महिला वय ७३ वर्षे रा नांदेड फाटा सिहगड रोड पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०९/२०२३ रोजी १५/००वा.सुमा.पुणे सातारा रोडवर अंबिका हॉटेलजवळ कात्रज, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी ह्या नमुद ठिकाणी बसची वाट पाहत असताना नमुद महिला हि फिर्यादी यांचे जवळ येऊन फिर्यादी यांना गप्पांमध्ये गुंतवुन फिर्यादीच्या कमरेला लावलेली छोटी कापडी पिशवी काढायला सांगुन ती पिशवी मोठया बॅगमध्ये ठेवते असे सांगुन पिशवी ही फिर्यादीच्या मोठया बॅगेत न ठेवता हातचालाखीने फिर्यादी यांचे ७०,०००/- रु कि.चे सोन्याचे मंगळसुत्र घेऊन गेली. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.पाटील फोन नं. २४३६५१०० |

**५**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे २७९/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ५६ वर्षे, रा वडगाव बुाा पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिं.१५/०९/२०२३ रोजी दुपारी १५/३० वा.च्या सुमारास दांडेकर पुल पुणे येथे पीएमटी बस मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया नमुद ठिकाणावरून त्यांचे घरी जाण्यासाठी पीएमटी बसमध्ये चढत असताना कोणीतरी अज्ञात इसमाने बस मधील गर्दीचा फायदा घेवुन फिर्यादीच्या एका हातातील १,००,०००/- रु.किं.ची सोन्याची बांगडी चोरुन नेली |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार पुकळे मो.नं. ८९९९६०१९४८ |

**६**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे २३५/२०२३,भादविक ४१९,४२०,३४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(डी) अन्वये |
| **फिर्यादी** | संतोष डोईफोडे वय ३२ वर्ष रा.तळजाई पठार धनकवडी पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अनोळखी इसमानी फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन त्यांना पार्ट टाईम नोकरीचे आमिष दाखवुन टास्क पुर्ण करुन सांगुन जास्त मोबदला देऊ असे आमिष दाखवुन वेळोवेळी विविध बँक खाते नंबर पाठवुन फिर्यादी यांची ६,१२,९६७/-रु.ची आर्थिक फसवणुक केली. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सुरेंद्र माळाळे मो नं ९३०७०४३८४५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**